# जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर

**(आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन शाखा)**

scy.ahmednagar@gmail.com (टोल फ्री क्र.1077) दुरध्वनी क्र. 0241-2343600

---

**विषय - कोरोना विषाणू (कोव्हीड19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपयायोजना करण्याबाबत.**

**वाचावे** - 1. आपत्ती व्यावस्थापन कायदा, 2005.
2. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897
3. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील आधिसुचना कोरोना2020/प्र.क्र.58/आरोग्य 5,दि.14/03/2020.
4. महाराष्ट्र शासन यांचेकडील आधिसुचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1, दिनांक. 25/03/2020.

क्र.आव्यमपु/कार्या 19अ/234/2020 **आदेश** अहमदनगर दि.26/03/2020

ज्याअर्थी, राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हीड 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायादा 1897 दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2,3,4 मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे. त्याअन्वये जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हीड 19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्यांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी घोषीत करण्यात आलेले आहे.

ज्याअर्थी, आंतरराष्ट्रीय स्तरावरुन व देशांतर्गत विमान प्रवासाव्दारे प्रवासी भारतात सर्वत्र प्रवास करीत आहेत. असे प्रवासी अहमदनगर जिल्हयामध्ये ही प्रवास करून आलेले आहेत. त्यामुळे कोरोना या विषाणूचा संसर्ग व प्रादुर्भाव पसण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. सदयस्थितीत कोरोना साथ व इतर उपचारांसाठी जिल्हयातील खाजगी दवाखाने, रुग्णालये व मेडीकल दुकाने सुरु राहणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, उपरोक्त प्रमाणे कोरोना विषाणूचे प्रसाराचे माध्यम पाहता सदर विषाणूची लागण एका संक्रमीत रुग्णाकडून अन्य व्यक्तीस/इसमास त्याच्या संपर्कात आलेने होण्याची शक्यता विचारात घेता, मी जिल्हाधिकारी अहमदनगर कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणुन नागरीकांची गैरसोय टाळणेसाठी साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावलीमधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार **अहमदनगर जिल्हयातील सर्व खाजगी दवाखाने, सर्व रुग्णालये तसेच सर्व मेडीकल दुकाने त्यांचे दैनंदिन वेळेनुसार सुरु ठेवणेबाबत या आदेशाव्दारे निर्देश देत आहे.**

जिल्हाधिकारी अहमदनगर

**(राहुल द्विवेदी)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, अहमदनगर**

प्रत -
1) जिल्हा पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांना पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित
2) आयुक्त, महानगरपालिका, अहमदनगर यांचेकडेस पुढील कार्यवाहीसाठी
3) जिल्हा शल्य चिकित्सक, अहमदनगर यांचेकडेस पुढील कार्यवाहीसाठी
4) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेकडेस पुढील कार्यवाहीवाहीसाठी
5) सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, अहमदनगर यांचेकडेस पुढील कार्यवाहीसाठी
6) उपविभागीय दंडाधिकारी (सर्व)________________ यांचेकडेस पुढील कार्यवाहीसाठी
7) तालुका दंडाधिकारी (सर्व)________________ यांचेकडेस पुढील कार्यवाहीसाठी
8) जिल्हा माहिती अधिकारी, अहमदनगर यांचेकडेस माहिती व पुढील कार्यवाहीसाठी